# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**तातडीचे**

**परिपत्रक क्र. ०२/२०२२**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आवारातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, विद्यार्थी/विद्यार्थीनी, रहिवासी अधिकारी/कर्मचारी, अभ्यागत निवास, उपाहारगृहे, भोजनालये यांना कळविण्यात येते की, सद्यस्थितीत पुणे महानगरपालिका, पाणीपुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्था आणि तांत्रिक बाबीमुळे पुणे शहराच्या विविध भागात तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून कमी दाबाने व अपूरा पाणी पुरवठा होत असल्याने पाणी टंचाई सदृश्य समस्या निर्माण होऊ शकते.

या अनुषंगाने निर्माण झालेली पाणी पुरवठयाची समस्या विचारात घेऊन उपलब्ध पाणीसाठा अत्यंत काटकसरीने वापरावा. विद्यापीठ प्रशासनाकडून उपलब्ध पर्यायांचा पुरेपूर वापर करुन पाणी पुरवठयाची समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. तथापि, पुणे महानगरपालिका, पाणी पुरवठा विभाग यांचा पाणी पुरवठा सुरळीत व पुरेश्या दाबाने होत नाही तोपर्यंत सर्वांनी पाणी वापराबाबत सहकार्य करावे.

(डॉ. प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे – ४११००७
जा.क्र. का.अ.प्र./स्थावर/२०२१–२२/636
दिनांक : २८/०३/२०२२

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :–**

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग
३. मुख्य वसतिगृह प्रमुख, वसतिगृह कार्यालय
४. गृहव्यवस्थापन विभाग

सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधित शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/ कर्मचारी, विद्यार्थी /विद्यार्थीनी यांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.